दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ९५ वा ▶ शुक्रवार दि. ९ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६



खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला



संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे


## न्यूज कॉलम

### मालपूर शिवारात इसमावर कुऱ्हाडीचा वार

धुळे । सामाईक बांधावरील निंबाच्या झाडाची फांदी तोडू नका, असे सांगितल्याचा राग आल्याने इसमास कुर्हाड फेकून मारल्याची घटना मालपूर शिवारातील शेतात घडली. जगन्नाथ परशराम कोळी, रा.वाल्मीकनगर, मालपूर या शेतकर्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, बादल धनराज कोळी, रा.महादेवपूर, मालपूर, ता.शिंदखेडा यास सामाईक बांधावरील निंबाच्या झाडाची फांदी तोडू नका, असे सांगितल्याचा राग आल्याने त्याने पत्नी,भावजाई यांना शिवीगाळ करीत त्याच्या हातातील कुर्हाड फेकून मारली. यात कुर्हाडीचा वार वाचविला असता उजव्या हाताच्या बोटाला व तोंडाला गंभीर स्वरूपाची जखम झाली. या फिर्यादीवरून दोंडाईचा पोलीस ठाण्यात बादल कोळी याचे विरूध्द गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

### देवपुरात हाणामारी; पाच जणांवर गुन्हा

धुळे । देवपूरमधील नगावबारी परिसरातील अष्टकोनी ओट्याजवळ हाणामारी झाली. भारत रमेश हाटकर याला भारत महाद हाटकर याने हाताबुक्क्यांनी मारहाण केली. वीट डोक्यात मारून जखमी केले. त्याच्या वडिलांनादेखील शिवीगाळ करून मारहाण केली. रमेश बडगुजर घरासमोर लघुशंका करतो, असे सांगितल्याच्या रागातून २९ वर्षीय महिलेस रमेश बडगुजर याच्यासह छायाबाई रमेश बडगुजर, भारत रमेश बडगुजर व रवींद्र रमेश बडगुजर (चौघे रा. प्रियदर्शिनीनगर, नगावबारी, देवपूर) यांनी तक्रारदार महिलेसह तिच्या पतीला मारहाण केली. शिवीगाळ करीत ठार करण्याची धमकी दिली.

# भुजबळांइतका खालच्या दर्जाचा मी नाही, मनोज जरांगे यांची जहरी टीका

### आता विरोध केल्यास मंडल आयोगाला चॅलेंज करणार

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आम्हाला मंडल आयोगाला चॅलेंज करायचे नाही. तीन वेळा भुजबळ यांनी विरोध केला आता चौथ्यांदा त्यांनी विरोध केल्यास मंडल आयोगाला चॅलेंज करणार असा स्पष्ट इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. भुजबळ हे राजीनामा देणारे नसून दुसऱ्यांचा राजीनामा घेणारे आहेत. त्यांच्या इतक्या खालच्या दर्जाचा मी नाही असे म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. भुजबळ यांच्या बालेकिल्ल्यात नाशिकमध्ये आज जरांगे यांचा दौरा होणार आहे. यावेळी ते बोलत होते.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. आज मंत्री छगन भुजबळ यांच्या नाशिक या बालेकिल्ल्यात त्यांची तोफ धडाडणार आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, कळवण, बागलाण, मालेगाव, नांदगाव येथे ते भेट देणार आहेत.

### माफी न मागणे ही मग्रुरी

**यावेळी जरांगे यांनी भुजबळ यांनी नाभिक समाजाची माफी मागावी अशी मागणी केली आहे. ते म्हणाले, छगन भुजबळ यांनी नाभिक समाजाचा अपमान केला आहे. त्यांनी माफी मागावी. त्यांनी माफी मागितली नाही तर ते मग्रुर आहेत असा अर्थ निघतो, असे मनोज जरांगे म्हणाले.**

### भुजबळ- जरांगे यांच्यात संघर्ष

**गेल्या काही दिवसांपासून छगन भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे. दोन्ही नेते एकमेकांवर टीका करत असल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करत सरकारने काढलेल्या अध्यादेशाला देखील भुजबळ यांनी विरोध केला आहे. त्यातच आज जरांगे नाशिक दौऱ्यावर असल्याने त्यांच्या या दौऱ्याला महत्व प्राप्त झाले आहे. तसेच जरांगे यांनी विरोधकांसह, राज्यकर्त्यांना इशारा दिला आहे. आता कोणाचेच ऐकणार नाही. अध्यादेशाची अंमलबजावणी न झाल्यास १० फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाला बसणार असून हे आमरण उपोषण कठोर असणार असे जरांगे यांनी स्पष्ट केले आहे.**



त्यापूर्वीच ते आक्रमक झालेत. नाशिक दौऱ्यात मनोज जरांगे यांची मराठा समाजाकडून ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत होण्याची शक्यता आहे. याशिवाय ते साडेतीन शक्तीपीठांपैकी आद्यपीठ असलेल्या सप्तशृंगी देवीचे दर्शनही घेणार आहेत. दौऱ्यापूर्वी मनोज जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला. बालेकिल्ला कोणाचा नसतो. नाशिक जिल्हा हा जनतेचा बालेकिल्ला आहे. छगन भुजबळ हे राजीनामा देणारे नसून दुसऱ्यांचे राजीनामे घेणारे आहेत, असा तिखट हल्ला जरांगे यांनी केले आहे. तसेच नाभिक समाजाची माफी न मागणे ही भुजबळांची मग्रुरी असल्याचेही जरांगे यांनी म्हटले आहे. सगेसोयरे अध्यादेशाचं कायद्यात रुपांतर व्हावं यासाठी १० फेब्रुवारीपासून जरांगे आमरण उपोषण करणार, भुजबळांमुळे आम्हाला मंडल आयोगाला चॅलेंज करावं लागेल असा इशारा मनोज जरांगेंनी दिला होता. त्यानंतर भुजबळांनी त्यावर जरांगेंना आव्हान दिलं होतं. मंडल आयोग हा ओबीसी आरक्षणाचा निर्माता, खरा पाटील असशील तर मंडल आयोग संपवून दाखव असं आव्हान राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना दिलं होतं.

# राज्य सरकारने १५ फेब्रुवारी रोजी बोलावले विशेष अधिवेशन

### मराठा आरक्षणासाठी विधेयक मांडण्याची शक्यता

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा आरक्षणाबाबत सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. येत्या १५ फेब्रुवारी रोजी मराठा आरक्षणासाठी विधिमंडळाचे विशेष आधिवेशन बोलवण्यात आले आहे. या अधिवेशनात मराठा आरक्षणासंदर्भात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.

कुणबीतील सगेसोयऱ्यांना प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने काढलेली अधिसूचना आणि मागासवर्ग आयोगाचा अहवाल या दोन्ही महत्त्वाच्या मुद्द्यांवर या अधिवेशनात चर्चा होणार आहे. त्यामुळे या अधिवेशातून मराठा सामाजाला आरक्षण मिळणार का याकडे राज्याचे लक्ष असणार आहे. मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. तर मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण द्यावे ही मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी लावून धरली आहे. त्यासाठी त्यांनी अंतरवाली सराटी ते मुंबई असा



महामोर्चाही काढला होता. त्यानंतर कुणबी नोंदी आढळलेल्या मराठा व्यक्तींच्या सगेसोयऱ्यांना पितृसत्ताक कुटुंबपद्धतीनुसार कुणबी दाखले देण्याची तयारी राज्य सरकारने दर्शवली होती. तशी अधिसूचनाही प्रसिद्ध झाली आहे. मात्र राज्य सरकारकडून अध्यादेश न निघाल्याने मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. त्या पार्श्र्वभूमीवर या अधिवेशनात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. आम्हाला मंडल आयोगाला चॅलेंज करायचे नाही. तीन वेळा भुजबळ यांनी विरोध केला आता चौथ्यांदा त्यांनी विरोध केल्यास मंडल आयोगाला चॅलेंज करणार असा स्पष्ट इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. भुजबळ हे राजीनामा देणारे नसून दुसऱ्यांचा राजीनामा घेणारे आहेत. त्यांच्या इतक्या खालच्या दर्जाचा मी नाही असे म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. यावेळी ते बोलत होते.

# आगामी अर्थसंकल्पीय बैठकीत मनपा प्राथमिक शाळा दुरूस्तीस विशेष प्राधान्य द्या : आयुक्त

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येत्या गुरूवारी होणार्या धुळे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय बैठकीत किमान चार ते पाच मनपा प्राथमिक शाळांच्या दुरूस्तीसह महिला व बालकल्याण तसेच दिव्यांग कल्याण योजनेच्या कामांवर विशेष भर देण्यात यावा, अशा सुचना आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी आजच्या स्थायी समितीच्या सभेत केल्या.

धुळे मनपाच्या आजच्या स्थायी समितीच्या सभेला आयुक्त अमिता दगडे-पाटील, नगर सचिव मनोज वाघ, सहा.उपायुक्त संगिता नांदुरकर, करमुल्य निर्धारण अधिकारी पल्लवी शिरसाठ यांचेसह नगर अभियंता कैलास शिंदे, आदी अधिकारी, कर्मचार्यांची उपस्थिती होती. स्थायी समितीच्या आजच्या बैठकीच्या सुरूवातीस हेमंत निकम व शोभा बाविस्कर हे दोन नवे उपायुक्त धुळे मनपाला लाभल्यानेत्यांची नावे जाहीर करून उपस्थित शोभा बाविस्कर यांचा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी सत्कार केला. त्यानंतर अजेंड्यावरील दहा विषयांचे वाचन नगरसचिव मनोज वाघ यांनी केले. दहा विषयांचे वाचन झाल्यावर उपस्थित अधिकार्यांना आगामी गुरूवारी होणार्या अर्थसंकल्पीय बैठकीत महिला व बालकल्याण योजनेसह अपंग बाल कल्याण योजनेवर भर देवून त्यातील कामे मार्गी लावण्याच्या सुचना आयुक्तांनी केल्या. विशेषतः मनपाच्या चार ते पाच प्राथमिक शाळांची दुरूस्तीचा विषय मार्गी लावावा, अशा सुचना केल्यात. यासह आमदार निधी मिळण्याची गती कमी असल्याने आमदार निधी लवकरात लवकर व जास्तीत जास्त मिळावा याकरीता विशेष प्रयत्न करण्याच्या सुचनाही केल्यात. आचारसंहितेपुर्वी अत्यावश्यक सेवांच्या कामांना प्राधान्य देवून ती पुर्ण करण्यात यावेत, असे आदेशही आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी यावेळी संबंधीत विभागाच्या अधिकार्यांना केल्यात.

# ना.शंभुराजे देसाईंनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत विनोद वाईन्स हटविण्याचे दिले आदेश



### व्हिडिओ कॉन्फरन्सिंगने आनंद लोंढेंची हजेरी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आझाद समाज पार्टीच्या वतीने गेल्या दोन महिन्यांपासून धुळे शहरातील मध्यवर्ती भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे असलेले विनोद वाईन्स हे विदेशी मद्याचे दुकान हटवावे यासाठी विविध प्रकारे आंदोलन करण्यात येत आहे.

या आंदोलनाला विविध पक्ष संघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आंबेडकरी चळवळीतील अनुयायी तसेच अनेक व्यक्तींनी पाठिंबा देऊन उपोषणकर्त्यांचं मानसिक बळ वाढविले. दि. ३ फेब्रुवारी रोजी उपोषणस्थळी आ.फारुख शाह यांनी भेट देवून उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना पाठिंबा दिला होता आणि आंबेडकरी जनतेच्या भावनेशी खेळणाऱ्या विनोद वाईन्सचा कायमचा निकाल लावण्यासंदर्भात मंत्रालयीन पातळीवर प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले होते. त्यानुसार गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री ना.शंभूराजे देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस आ.फारुख शाह, जिल्हाधिकारी धुळे, (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) पोलीस अधिक्षक, (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) धुळे, मुकुंदराव शिरसाठ, सुमित साबळे. जितेंद्र निकाळजे, कैलास जैस्वार आणि उपोषणकर्ते आझाद समाज पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आनंद लोंढे हे धुळे येथील उपोषण स्थळावरून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी झाले. या बैठकीत धुळे येथील उपोषणस्थळावरून आबा अमृतसागर, भैय्यासाहेब वाघ, राज चव्हाण, आनंद सैंदाणे, मुकेश खरात, आसिफ शाह, संजय अहिरे, विनोद केदार, भैय्यासाहेब वाघ, किरण भालेराव, दावल वाघ, चिंतामण थोरात, मुकेश वाघ, डॉ.शरद भामरे, अरविंद निकम, दिनेश निकूंभे आदी सहभागी झाले होते.

# उपमुख्यमंत्री फडणवीस विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी उद्या नाशकात

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त



नाशिकलाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखराकडे नेणारे महाराष्ट्राचे विकास पुरुष देवेंद्र फडणवीस हे नाशिक शहरातील विविध विकास कामांच्या लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्यासाठी नाशकात येत आहेत. त्यानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती भाजप नाशिक महानगर शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिली.

नाशिक मध्यच्या आमदार देवयानी फरांदे, नाशिक पूर्वचे आमदार राहुल ढिकले व नाशिक पश्र्चिमच्या आमदार सीमा हिरे यांच्या विकास निधीतून अनेक कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यांचे लोकार्पण व अनेक कामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न होत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुपारी २.३० वाजता ओझर विमानतळावर आगमन होणार असून लगेचच दुपारी २.४५ वाजता नाशिक पूर्व मतदारसंघातील विविध कामांचे उद्घाटन नंतर मॅरेथॉन चौकात जलपरिषेद रथाचे उद्घाटन, दुपारी ४ ते सायंकाळी ६ वाजता या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अकॅडमी येथील आयोजित क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभास उपस्थित राहणार आहेत.

# माता रमाई जयंतीदिनी ईरशाद जहागीरदार यांच्या हस्ते रमाई नगरात झालं बोअरवेलचं लोकार्पण

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

गेल्या काही दिवसांपूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे धुळे दौरा करीत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस इर्शाद जहागीरदार यांच्या मागणीनुसार त्यांनी या ठिकाणी ५० बोरवेलचे डिजिटल पद्धतीने उद्घाटन केले होते. त्याच बोरवेलपैकी पहिल्या बोअरवेलच्या लोकार्पण सोहळा माता रमाई जयंतीच्या निमित्ताने शहरातील साक्री रोड येथील रमाई नगर येथे संपन्न झाला.

रमाई नगर ह्या परिसरात गोरगरीब नागरिक राहत



असल्याने त्या ठिकाणी पाण्याची टंचाई भासत असते. या ठिकाणी राष्ट्रवादीचे पदाधिकारी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील व स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत मत रमाईंना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी, मनोज गर्दे, अतुल पाटील, राजेंद्र चितोडकर, सुरेश आहिरे, समीर खान, वंदना केदार, रंजना इंगळे, संजय आहिरे, रविंद्र इंगळे, चंद्रगुप्त खैरनार, पंकज बागले, प्रदीप बागले, गोकुळ सोनवणे, किरण अहिरे, शुभम धिवरे, धनंजय सोनवणे, रोहित खैरनार, अक्षय पानपाटील आदी नागरिक उपस्तित होते.

# महाराष्ट्रात योग आयोग स्थापन झालाच पाहिजे : योगशिक्षक संघाची मागणी

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

योगाच्या प्रचार, प्रसारासाठी कटिबद्ध असलेल्या महाराष्ट्र योगशिक्षक संघ नाशिक जिल्हा शाखेच्या वतीने व संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मनोज निलपवार यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन झाला पाहिजे यासह व इतर मागण्यांसाठी नाशिकचे अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनासोबत योग शिक्षक संघाचे बारा सूत्री मागणी पत्र व हरियाणा योग आयोग ॲक्ट आणि महायोगोत्सव नागपूर २०२३ येथे योग आयोगाबाबत



करण्यात आलेला ठरावाची प्रत जोडण्यात आली आहे.

सर्व योगशिक्षक सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून राज्यात योगाचा प्रसार करण्यासाठी व समाज स्वास्थ्यासाठी पदरमोड करून झटत आहेत. परंतु त्यांच्या मागण्यांकडे शासनस्तरावरून दुर्लक्ष होत आहे. देशातील राजस्थान, गुजरात व हरियाणा राज्यांमध्ये योग आयोग स्थापन झाला असून कार्यवाही सुरु आहे. याप्रसंगी महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे राज्य कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, उत्तर महाराष्ट्र प्रमुख उत्तमराव अहिरे, जिल्हाध्यक्ष जिवराम गावले, राज्य ग्रामीण प्रकोष्ठ डॉ. तस्मिना शेख, जिल्हा महासचिव गीता कुलकर्णी, डॉ. अंजली भालेराव, मेघा भावसार, भारती सोनवणे, योगिता शिलारकर, शिवानी देशपांडे आदीसह योगशिक्षक उपस्थित होते.

# दादागिरी', 'भाईगिरी' खतम होऊन आता 'पोलिसगिरी' सुरु होणार?

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाकडून हिस्ट्रीशिटर्स यांची हजेरी घेतली जात आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यांमध्ये कथित दादा, भाईंना पोलिसांसमक्ष उभे रहावे लागत आहे. पोलिसांनी सुरू केलेल्या धडक कारवाईमुळे उपद्रवींचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. शहरातील रस्त्यांवरून रात्री अपरात्री बाईक फॅशन करत टुकारगिरी करणारे टोळके पोलिसगिरीमुळे गायब झाले आहेत.

पोलिसांनी चालविलेल्या या शस्त्रामुळे प्रमुख राजकीय पक्षांचे उपद्रवी नेते आणि त्यांचे कार्यकर्ते आधीच घायाळ झाले त्यातच पोलिसांनी धडक मोहीम राबवून जूगार, दारू यावर छापासत्र सुरू केल्याने अवैध व्यवसायिकांचेही धाबे दणाणले आहेत. धुळे पोलिसांनी क्यूआर कोड स्कॅनिंगसाठी एक ॲप विकसित केले आहे. त्यात प्रत्येक क्यूआर कोड स्कॅनिंग झाल्यानंतर त्यांच्या नोंदी ॲपमध्ये होतील. त्या नोंदींमध्ये प्रत्येक बीट मार्शलने किती वाजता, कोणत्या ठिकाणी भेट दिली यांच्या नोंदी असतील. पेट्रोलिंगची प्रत्येक नोंद जिल्हा नियंत्रण कक्ष, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय व पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना रोज दिसेल. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीला चाप बसणार आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त सुरू केली आहे यामध्ये रात्री अपरात्री विनाकारण फिरणा या टोळक्यांना पोलिसांकडून जाब विचारला जात आहे. तसेच वाहनांचीही तपासणी केली जात आहे. त्यामुळे रात्री रस्त्यावर एकत्र उभा राहून आरडाओरडा करणारे, महिलांची छेड काढणारे रोडमिओ सध्या गायब झालेले दिसत आहेत. शहरात पोलिसगिरी अशीच कायम रहावी, अशीच सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.7057011126

### भाईगिरीचा आवाज क्षीण

**पोलिसांनी 'खाकी'चा दम दाखविण्यास सुरूवात केल्याने चौकाचौकात दादागिरी करणा या गल्लीतील दादा आणि भाईचाही आवाज सध्या क्षीण झाला आहे. निवडणुकीच्या काळात गल्लीबोळातील दादांना सुगीचे दिवस येत होते. या निवडणुकीत मात्र राजकीय पक्षांचे नेते आणि उमेदवारांनी अशा दादा, भाईपासून चार हात दूर राहनेच पसंत केले आहे.**

### कठोर कारवाई होणार

**नामचीन गुंडांचे बहुधा त्यांच्या चिल्ल्या पिल्ल्या लोकांनी त्यांच्या भाईंच्या नावाने अनेक अकाउंट बनवले आहेत आणि याच अकाउंटवर पोलिसांच्या गुन्हे शाखेची करडी नजर आहे. कुठल्या ही गुन्हेगारीचे उदात्तीकरण करत असल्याच्या पोस्ट किंवा व्हिडीओ दिसले तर ते अकाउंट तर सस्पेंड होईलच पण ते चालवणारे तरुणांवर कठोर कारवाई केली जाणार आहे, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.**

### रात्रीच्या बर्थ डे सेलिब्रेशनला ब्रेक

**गेल्या काही दिवसांपासून शहरात रात्री बारा वाजता रस्त्यावरील चौकात बर्थ डे सेलिब्रेशन करण्याची फॅशन रूढ झाली आहे. मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी दहा-वीस तरूण रात्री चौकात केक कापून म्युझिक लावून झिंगाट होतात. यामुळे परिसरातील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत होता. रस्त्यावर अशा पद्धतीने गोंगाट करणाऱ्यावर पोलिसांनी सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी कारवाई सुरू केल्याने असे बर्थ डे बॉय सध्या गायब झाले आहेत.**

# प्री-प्रायमरी ते ४ थी पर्यंतची शाळा सकाळी ९ नंतर भरवा

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजता किंवा नऊ वाजेनंतर भरवाव्यात, असे आदेश राज्य शासनाच्या वतीने देण्यात आले आहे. यासंदर्भात राज्य शासनाच्या वतीने परिपत्रक देखील जारी करण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे शाळांना आता चौथी पर्यंतच्या वर्गाचे वेळापत्रक बदलावे लागणार आहे.

राज्यपाल रमेश बैस यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात सांगितले होते की, आजकाल लोकांच्या जीवनशैली बदलली आहे. राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांपैकी काही शाळा विशेषत: खाजगी शाळा भरवण्याच्या वेळा साधारणपणे सकाळी ७ नंतर असल्याचे दिसून आले. आधुनिक युगातील बदलती जीवनशैली, मनोरंजनाची साधने, शहरातील उशीरापर्यंत सुरू असलेली जीवनशैली, ध्वनी प्रदूषण आदी कारणांमुळे रात्री उशीरापर्यंत झोपत नाही. यासह अनेक कारणे देत शासनाच्या वतीने हा निर्णय घेण्यात आला.

## चुकीला चपराक..!

विधि मंडळांचे पीठासीन अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी कोणत्याही पक्षाचे नसतात. त्यांनी नि:पक्षपाती राहणे अपेक्षित असते. चंडीगढ मध्ये तसे न घडल्याने सर्वोच्च न्यायालयाने चपराक दिली आहे. चंडीगढच्या महापौरपदाच्या निवडणुकीत अयोग्यच नव्हे, तर लोकशाही विरोधी वर्तन केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक निर्णय अधिकार्यावर ताशेरे ओढले आहेत. एका शहराच्या महापौरपदाची निवडणूक ही खरे तर देशाने दखल घेण्याजोगी नसते. मात्र या वेळी भारतीय जनता पक्ष आणि आम आदमी पक्ष व काँग्रेस यांच्या युतीमध्ये ही लढत झाल्याने त्यात चुरस निर्माण झाली होती. प्रसार माध्यमांनी भाजप विरुद्ध 'इंडिया' आघाडी अशी लढत होत असल्याचे चित्र निर्माण केले होते. महापालिकेतील ३५ निवडून आलेले सदस्य व एक चंडीगढचा खासदार असे ३६ मतदार या निवडणुकीत मतदान करणार होते. नेहमीप्रमाणे दोन्ही बाजूंनी आधीच बहुमताचे दावे करण्यात आले होते. मतदान झाले. नंतर मतमोजणी झाली आणि भाजपचा उमेदवार १६ विरुद्ध १२ मतांनी विजयी झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निकालावर 'आप'व काँग्रेसने आक्षेप घेतला. कारण आठ मते अवैध ठरल्याचे निवडणूक निर्णय अधिकार्याने जाहीर केले. आपल्या बाजूने २० मते असल्याचा दावा 'आप'व काँग्रेसने केला होता. त्यामुळे या निवडणुकीत, विशेषत: मत मोजणीत गैरप्रकार झाल्याचा आरोप त्यांच्यातर्फे करण्यात आला. युतीने पंजाब व हरयाना उच्च न्यायालयात धाव घेतली; पण त्या न्यायालयाने हस्तक्षेपास नकार दिला. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. सर न्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील एका पीठाने संबंधित महापौरपदाच्या निवडणुकीच्या कामकाजाची चित्रफीत पाहिली. त्यात निवडणूक निर्णय अधिकारी अनिल मसिह यांचे वर्तन बघून या पीठाने संताप व्यक्त केला. 'ही लोकशाहीची थट्टा आहे. निवडणूक निर्णय अधिकारी लोकशाहीची हत्या करत आहे, निवडणूक घेण्याची ही पद्धत आहे का?' अशी टिप्पणी पीठाने ती चित्रफीत बघताना केली. मतपत्रिकेवर तळावर 'फुली'चे चिन्ह असल्यास मसिह ती पत्रिका ट्रेमध्ये ठेवत आहेत, व ज्या मतपत्रिकेच्या वरच्या भागात 'फुली'चे चिन्ह असेल ती पत्रिका 'विद्रूप' करत असल्याचे व नंतर मसिह कॅमेर्याकडे बघत असल्याचेही या चित्रफितीत स्पष्ट दिसत आहे. जणु काही कोणी आपल्याला बघत आहे की नाही हे तपासण्याची ती कृती होती. यावर 'सर्वोच्च न्यायालय तुमच्यावर लक्ष ठेवून आहे हे तुमच्या निवडणूक निर्णय अधिकार्यास सांगा' अशी तंबी पीठाने दिली. निवडणूक निर्णय अधिकार्याने मतदानाची प्रक्रिया योग्य प्रकारे पार पडत आहे की नाही एवढेच बघणे अपेक्षित असते. त्याने कोणाची बाजू घेणे अपेक्षित नसते. मात्र मसिह यांनी काही मतपत्रिका जाणून बुजून खराब केल्या व नंतर त्या अवैध ठरवल्या हे चित्रफितीत दिसत असल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या पीठाने सर्व मतपत्रिका,अन्य संबंधित कागदपत्रे व संपूर्ण मतदान प्रक्रियेचे चित्रण या सर्व बाबी पंजाब व हरयाना उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांच्या ताब्यात देण्याचा आदेश दिला आहे. कारण तो पुरावा आहे आणि त्यात कोणी बदल अथवा अन्य गैरप्रकार करू नये याची खातरजमा न्यायालयास करायची आहे. चंडीगढ महापलिकेची पहिली बैठक बेमुदत लांबणीवर टाकण्याचा निर्णयही न्यायालयाने जाहीर केला. याचा एक अर्थ ही निवडणूकच अवैध आहे असा घेता येतो. या प्रकरणी पुढील सुनावणी येत्या दि.१९ रोजी होणार आहे. त्या वेळी मतदान प्रक्रियेचे संपूर्ण चित्रण न्यायालयासमोर ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे.त्याच वेळी अनिल मसिह यांनाही उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. 'निवडणूक प्रक्रियेची शुद्धता ही या दशातील एक चांगली गोष्ट आहे, असे नमूद करून, लोकशाहीची अशा प्रकारे हत्या आम्ही होऊ देणार नाही' असेही न्यायालयाने सुनावले आहे. या निवडणुकीत कोण जिंकले या पेक्षाही निवडणूक प्रक्रियेच्या शुद्धतेस जास्त महत्त्व न्यायालयाने दिले आहे. अनिल मसिह एका बाजूने वागत असल्याचे चित्रफितीद्वारे सिद्ध होत आहे म्हणून न्यायालयाने आपला संताप व्यक्त केला. त्यांचे वर्तन कायदा, घटना व संकेत यांच्या विरुद्ध असल्याने न्यायालयाने फटकारले आहे.

## गृहनिर्माण परिषद व पुरस्कार वितरण सोहळा

नाशिक शहरातील साडे पाच हजार सहकारी गृहनिर्माण संस्था व सुमारे वीस हजार अपार्टमेंट असोशिएशन आणि प्रिमायसेस संस्था आहेत.

सध्या शहराचा विकास त्याचप्रमाणे गृहनिर्माण संस्थाची व प्रिमायसेस इमारतीची वाढलेली संख्या बघता त्या-त्या संस्थामधील स्वच्छता व सुरक्षेला जास्त महत्व प्राप्त झालेले आहे. नाशिकच्या विकासात गृहनिर्माण चळवळीचा बहुमुल्य सहभाग आहे.

या सर्व संस्थांसाठी हाऊसिंग दरबार, कार्यशाळा, बैठका व प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम दि नाशिक डिस्ट्रीक्ट को - ऑप हाऊसिंग सोसायटीज् को-ऑप फेडरेशन लि. ही संस्था व जिल्हाउपनिबंधक आणि तालुका उपनिबंधक सहकारी संस्था घेत असतात.

अशाच प्रकारे फेडरेशनच्या माध्यमातून व सहकार विभागाच्या माध्यमातून दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी महाकवी कालीदास कलामंदिर नाशिक येथे गृहनिर्माण परिषद, कार्यशाळा व सर्वोकृष्ट गृहनिर्माण संस्था पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. सदर कार्यक्रमात पुरस्कारांबरोबरच ज्या संस्थांचे प्रतिनिधी कार्यक्रमासाठी नाव नोंदणी करुन हजर राहतील त्या सभासद पदाधिका-यांना गृहनिर्माण संस्था कार्यशाळेत सहभाग घेतल्याबदल प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. त्यासाठी सोसायटी सभासदांनी व पदाधिका-यांनी परीषदेचा व कार्यशाळेत उपस्थीत राहणेबाबतचा प्रतिनीधी नोंदणी करावयाची आहे.


शहरातील सुमारे तीस वर्षापुर्वीच्या हजारो गृहनिर्माण संस्थाच्या जुन्या इमारती विकसकांना व कंत्राटदारांना पुनर्विकास करा म्हणून खूनवत आहेत.

परिषदेत प्रामुख्याने शहरातील हाऊसिंग सोसायटयांच्या जुन्या इमारतींचा आधुनिक पूनर्विकास व स्वयंपूनर्विकासासाठी अर्थसहाय्य आणि मनोगत या विषयांवर मा. आ. श्री. प्रविण दरेकर ( गटनेते, विधानपरिषद व अध्यक्ष मुंबै बँक), हे बहुमुल्य मार्गदर्शन करणार आहेत.

गृहनिर्माण संस्था व्यवस्थापनेबाबत सखोल मार्गदर्शन व अभ्यासपुर्ण माहिती साध्या व सोप्या उदाहरणांसह पटवून सांगणारे मा.श्री. अनिल कवडे



(भाप्रसे) सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य पूणे हे समजावुन सांगणार आहेत. गृहनिर्माण संस्थांनी एकतर्फा मालकीहक्क (महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट - १९६३) अन्वये कसे प्राप्त करावे, पूनर्विकास पूर्वीमालकी हक्क कसे मिळवावे यासाठी मानीव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेयन्स) सोसायटीने एन. ओ. टॅक्स भरावा की भरु नये, तसेच सोसायटींचा सभासद सदनिकाधारक हा ग्राहक नसल्याने जी.एस.टी भरावा लागू नये या विषयांवर ॲड. श्रीप्रसाद परब जेष्ठ विधीज्ञ मुंबई उच्च न्यायालय व महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महासंघाचे तज्ञ संचालक हे मार्गदर्शन करणार आहेत. गृहनिर्माण संस्थांची दरमहा मासीक देखभाल शुल्क न भरणा-या ठाण्यातील एका सोसायटीतील उपद्रवी सभासदांवर जप्तीचा बडगा उगारणारे ठाणे जिल्हा हासिंग फेडरेशनचे चेअरमन व दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप हासिंग फायनान्स कार्पो. लि. मुंबईचे संचालक मा. श्री सितारामजी राणे हे गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन व इमारत देखभाल



डॉ . वसंतराव तोरवणे
(नाशिक) मो.९४२२२ ४८३७१

वर्गणी वसूली कशी करावी याबाबत अतिशय साध्या-सोप्या भाषेत मार्गदर्शन करणार आहेत. गृहनिर्माण संस्थाचे लेखापरीक्षण व वार्षिक सभा वेळेत घेतल्या नाहीत, निवडणूका घेतल्या नाहीत म्हणून बहुतांश सोसायटया अवसायनात गेल्या आहेत. सोसायटयांचे लेखापरीक्षण, निवडणूका व पूनर्जिवन कसे करावे या विषयांवर मा. श्री. सुहास पटवर्धन अध्यक्ष महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण संस्थांचा महासंघ व पूणे जिल्हा गृहनिर्माण संस्थांचा महासंघ हे मार्गदर्शन करणार आहेत. आयकर कायदा व गृहनिर्माण संस्था या क्लिष्ट विषयांवर चार्टड अकाउंटट श्री ललीत पवार हे मार्गदर्शन करणार आहेत. जी.एस.टी, टी.डी.एस., व रेरा कायदा व गृहनिर्माण संस्था या क्लिष्ट विषयांवर चार्टड अकाउंटट श्री आर. एस. बस्ते हे मार्गदर्शन करणार आहेत. अत्याधुनिक पद्धतीने पूनर्विकास व स्वयंपूनर्विकास करतांना लागणारा प्रकल्प अहवाल, स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट, मिळणारा एफ.एस.आय, टी.डी. आर., प्रिमीयम, ॲन्सीलरी व बेटरमेंट चार्जेस, याबाबत आणि जून्या नाशकातील गावठाण वाडयांची क्लस्टर डेव्हलपमेंट या बाबत अर्किटेक्ट श्री. विजय सानप, नॅशनल प्रोसिडेंट, दि असोशिएशन ऑफ कन्स्लटींग सिव्हील इंजिनिअर्स (इंडिया) हे मार्गदर्शन करणार आहेत. शहरातील सर्वोत्कृष्ट गृहनिर्माण सहकारी संस्था गृहनिर्माण परिषद व पुरस्कार वितरण सोहळ्यास मा. आ. प्रविण दरेकर, पालकमंत्री मा.ना. दादाजी भुसे, मा. अनिल कवडे, सहकार आयुक्त व सन्माननीय आमदार व खासदार यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच ॲड. वसंतराव तोरवणे लिखीत 'मी फ्लॅट मालक' या पूस्तकाचे प्रकाशन केले जाणार आहेत. शहरातील सर्व गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंटस्च्या पदाधिका-यांनी परिषदेचा लाभ घेणा-याना व कार्यशाळेत सहभागी होणा-या सभासदांना सोसायटी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व सोसायटी व्यवस्थापन शिक्षण-प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याबाबतचे आवहात फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. वसंतराव तोरवणे यांनी दिली. सदर कार्यक्रमाचे आयोजक जिल्हाउपनिबंधक व गृहनिर्माण संस्थांचा महासंघाचे ॲड. वसंत तोरवणे, श्री. मधुकर फटांगरे, श्री. अजित ओस्तवाल, ॲड. परमानंद गुजराथी, श्री. सुनिल मराठे, श्री. लक्ष्मीकांत पारनेरकर, श्री. सुदाम निकम, श्री. अनिल कठपाल, श्री. रमेश मालपुरे, श्री. उद्धव गांगुर्डे, श्री. नरेंद्र सोनवणे, श्री. देविदास कापडनीस, श्री. सचिन नाळेगांवकर, श्री. किरण शिंदे, ॲड. निलेश गायखे, श्री. मोहन वानखेडे, ॲड. निलेश पाटील, ॲड. सुधाकर देसले, प्रसिद्धी प्रमुख ॲड. महेंद्र सुर्यवंशी, श्री. दिलीप साळुखे. भालेराव, सहकारभारतीचे श्री. शरद जाधव, श्री. मुंकुद गायधनी, श्री. शिरीष ऑडिटर कौन्सिल वेलफेअर असोशिएशनचे अध्यक्ष श्री. संदीप नगरकर, श्री. प्रकाश गायकर, श्री. पंडीत देशमाने, श्री. केदु पारखे, एस. सी. पाटील, श्री. दिपक पासलकर, श्री. सुनिल वारुंगसे, श्री. विजय सोनवणे व श्री. विजय काळे, श्री. खाडे व सर्व लेखापरीक्षक परीषद आयोजीत करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## विकासाचा 'म्युच्युअल' मंत्र

आज लाखो लोक एसआयपीमार्गे म्युच्युअल फंडात पैसे गुंतवतात. डिसेंबर २०२३ मध्ये भारतातील म्युच्युअल फंडांच्या व्यवस्थापनाखालील मालमत्तांचे प्रमाण प्रथमच ५० लाख कोटी रुपयांवर जाणे, ही आनंदाची बाब आहे. महागाईला तोंड देण्यासाठी आपली बचत अधिक फायद्याच्या ठिकाणी गुंतवणे महत्त्वाचे ठरते. त्या दृष्टीने म्युच्युअल फंड चांगले ठरत असल्याची जाणीव लोकांना होणे ही स्वागतार्ह बाब आहे.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बँका, पोस्ट ऑफिसच्या योजनांपेक्षा अधिकची कमाई करून देते. एसआयपी (सिस्टीमॅटीक इन्व्हेस्टमेंट प्लॅन)मध्ये गुंतवणुकीचे अनेक पर्याय आहेत. भारतात 'एसआयपी'मध्ये वेगाने गुंतवणूक वाढत आहे. एसआयपीमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. सात वर्षांपूर्वी मासिक एसआयपी गुंतवणूक तीन हजार कोटी रुपये होती. आता हा आकडा वाढून दर महा १६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. तज्ज्ञांच्या मते एसआयपीमधून सरासरी १२ टक्के परतावा मिळतो. 'एसआयपी'मध्ये दीर्घकाळ गुंतवणूक करून भविष्यासाठी मोठा निधी उभारता येतो.

सर्वसामान्य लोकांना कंपन्यांची माहिती मिळवणे आणि तिचे विश्लेषण करून अंदाज बांधणे हे शक्य कोटीतले वाटत नाही. बर्याचजणांना तेवढा वेळही नसतो. काहीजण कोणत्या कंपनीचे शेअर्स घ्यावेत आणि कोणते विकावेत याबाबत ओळखीच्या लोकांकडून 'टिप्स' घेतात; परंतु या टिप्स विश्वासार्ह नसल्यास चुकीच्या शेअर्समध्ये गुंतवणूक अडकून पडते. जास्त भावाला घेतलेला शेअर कोसळल्यास गुंतवणूकदार घाबरून विकण्याच्या मागे लागतो किंवा



अविचाराने एखादा शेअर वारेमाप भावाने विकत घेतो आणि नंतर त्याचा भाव न वाढल्यास किंवा घसरल्यास, पश्चाताप करू लागतो. या सर्व भानगडी करण्यापेक्षा म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणे अधिक योग्य ठरते. कारण तुमच्या वतीने गुंतवणूक करण्याचा निर्णय तो म्युच्युअल फंड करत असतो. त्या फंडाकडे तज्ज्ञांची फौज असते.

स्वतंत्र फंड व्यवस्थापक असतो. आज लाखो लोक म्युच्युअल फंडात पैसे टाकतात किंवा एसआयपीमध्ये निधी गुंतवतात. या पार्श्वभूमीवर डिसेंबर २०२३ मध्ये भारतातील विविध म्युच्युअल फंडांच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या मालमत्तांचे प्रमाण प्रथमच ५० लाख कोटी रुपयांवर जाणे, ही आनंदाची बातमी आहे. यावरून म्युच्युअल फंड उद्योग किती लोकप्रिय होत आहे आणि खासकरून समभाग वा शेअर संलग्न योजनांमध्ये लोक मोठ्या प्रमाणात आपली बचत गुंतवत आहेत, असे दिसते. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड इन इंडिया' या संस्थेने आपल्या अहवालात ही माहिती दिली आहे. त्यामध्ये एसआयपी योजनेअंतर्गत १७,६१० रुपये आकर्षित झाले आहेत. डिसेंबर २०२३ मध्येच ४०,३२,६४३ एवढ्या नवीन एसआयपीजची नोंदणी झाली.


भारतातील म्युच्युअल फंडात दहा लाख कोटी रुपये जमा होण्यास पन्नास वर्षे लागली; परंतु ४० लाख कोटी रुपयांवरून ५० लाख कोटी रुपयांपर्यंत निधीची मजल मात्र गेल्या दहा वर्षांमध्ये मारली गेली आहे. याचा अर्थ, २०१४ पासून म्युच्युअल फंड उद्योगाचा विकासदर अधिक वेगवान आहे. सध्या देशामध्ये राजकीय स्थैर्य आहे. केंद्रात आणि अनेक राज्यात एकाच पक्षाचे राज्य आहे. त्याचप्रमाणे व्यापार आणि उद्योगाला अनुकूल अशी धोरणे आखली जात आहेत. अर्थात जीएसटी प्रणालीमुळे आंतरराज्य व्यापारही वाढला आणि ही प्रणाली यावी, म्हणून २०१४ च्या अगोदरपासूनच प्रयत्न सुरू होते. देशातील आर्थिक उदारीकरणाची धोरणे मोदी सरकार आल्यापासून कायम आहेत. शिवाय २००८ मध्ये आली तशी जागतिक मंदी त्यानंतर आलेली नाही. नरमाई जरूर आली, परंतु मंदी येणे किंवा बड्या बड्या बँका, विमा कंपन्या, वित्तसेवा देणाऱ्या कंपन्या कोसळणे हे प्रकार मोठ्या प्रमाणात झालेले नाहीत.

२०१४ पूर्वी कच्च्या तेलाचे भाव ज्या प्रमाणात वाढले होते, तसे ते त्यानंतर वाढले नाहीत. या अनुकूलतेचाही फायदा २०१४ नंतर झाला, हे नाकारता येणार नाही. आज म्युच्युअल फंडसच्या विश्वात इक्विटी किंवा समभाग संलग्न योजना सगळ्यात लोकप्रिय आहेत. त्यातही विशिष्ट क्षेत्रातील किंवा थिमॅटिक फंड योजना लोकांना जास्त रुचत आहेत. गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात स्मॉल कॅप फंडामध्ये ३,६९९ कोटी रुपये जमले, तर डिसेंबरमध्ये हा आकडा ३,८५७ कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला. लार्ज आणि मिडकॅप फंडांमध्ये डिसेंबरमध्ये अनुक्रमे २,३३८ आणि १,३९३ कोटी रुपये आकर्षित झाले.

नोव्हेंबरच्या तुलनेत डिसेंबरमधील लार्ज कॅप फंडातील निव्वळ आवक वाढली, तर मिडकॅप फंडातील आवक घटली. एकूण लोक केवळ बँका वा कंपन्यांतील ठेवी, अथवा पोस्टाच्या योजना यावरच भर न देता, जास्त उत्पन्न देणाऱ्या म्युच्युअल फंडांकडे वळत आहेत ही चांगली गोष्ट आहे. गेल्या डिसेंबरमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित असलेल्या चलन फुगवट्याचा दर त्या अगोदरच्या आठ महिन्यांपेक्षा जास्त होता. थोडक्यात, भाववाढीचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. अशा वेळी महागाईला तोंड देण्याचा मार्ग म्हणजे आपण पै-पै साठवून निर्माण करत असलेली बचत अधिक फायद्याच्या ठिकाणी गुंतवणे. शिवाय फायदा बघताना त्यामध्ये कमीत कमी धोका असणे श्रेयस्कर असते. त्या दृष्टीने म्युच्युअल फंड अर्थातच अधिक चांगले ठरतात. लोकांना याची जाणीव होणे ही स्वागतार्ह बाब आहे, असेच म्हणावे लागेल.

'एसआयपी'मध्ये गुंतवणूक करण्याचे अनेक फायदे आहेत; पण एखादी चूक महागात पडू शकते. 'एसआयपी'चा पहिला फायदा तिथल्या गुंतवणुकीचा कालावधी आणि रकमेबाबत लवचिकता हा आहे. म्हणजेच सोयीनुसार मासिक, त्रैमासिक किंवा अर्धवार्षिक गुंतवणूक कालावधीचा पर्याय निवडता येतो. याशिवाय गरज असते तेव्हा गुंतवणूक करता येते आणि 'एसआयपी'मधून पैसे काढता येतात. उत्पन्न वाढले की पुन्हा गुंतवणूक वाढवता येते. 'एसआयपी'मध्ये चक्रवाढीचा मोठा फायदा आहे. गुंतवणुकीवर चक्रवाढव्याज मिळते. त्यामुळे एसआयपीमध्ये दीर्घकाळासाठी गुंतवणूक करणे जास्त फायदेशीर ठरते. तज्ज्ञांच्या मते 'एसआयपी'मध्ये दर वर्षी पाच किंवा दहा टक्के दराने थोडी रक्कम गुंतवल्यास दीर्घकाळात मोठा फायदा होतो. 'एसआयपी'मध्ये रुपयाच्या सरासरी खर्चाचा फायदा मिळतो. म्हणजेच बाजार घसरत असेल आणि पैसे गुंतवले असतील तर जास्त युनिट्स मिळतात आणि मार्केट वाढत असेल तर वाटप केलेल्या युनिट्सची संख्या कमी होते. अशा परिस्थितीत बाजारातील चढ-उतारांच्या बाबतीतही खर्च सरासरी राहतो. म्हणजे बाजार घसरला तरी नुकसान होत नाही. बाजार वाढतो तेव्हा सरासरी गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याची संधी मिळते.

## शब्दकोडे-३१५



आडवे शब्द : १. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया ५. उत्कंठा वाढवणारा (आडवा १ च्या) पुढचा टप्पा ८. पराजय ११. नेहमी, पक्का १२. जाणकार १३. हजार किलो १४. दुप्पट (इंग्रजी) १५. मोठा भाऊ १६. चिखलाची मऊ जमीन १९. सारखा २०. हिंदीत शेतकरी २२. खराब २३. मुस्लिम प्रार्थना पद्धत २५. शरीर २६. वस्तू, माल २७. मन, विचार २८. उदार, महात्मा २९. दक्ष ३१. दागिना ३२. 'हरिणीचे ---, व्याघ्रे धरियले' (संत कान्होपात्रा) ३५. पुरुष ३६. दरवळ ३८. हिम्मत ३९. कापड विणणारा ४१. क्रिकेटमधील धाव ४२. अदृश्य, गुप्त (होणे) ४३. मोठा, भव्य ४४. मान्यतेचे अक्षर ४५. धाक, जरब ४६. रेशमी धोतर ४७. पालिकेतील लोकप्रतिनिधी ५१. कारकून ५३. सोन्या-चांदीचा धागा ५४. नारायण नारायण मंत्र जपणारा ५५. खोटे आश्वासन देणारा ५७. मज्जाव, बंदी ५८. मोगऱ्याची एक जात ६१. कावळा ६२. गणपतीचे एक नाव ६४. पोरका ६५. हार, सर ६७. तपासणी (इंग्रजी) ६८. सांकेतिक चिन्ह, शब्द (इंग्रजी) ६९. शहर ७०. वरवर, दिखाऊ ७३. फुलांची मोठी माळ ७५. सीतेचे वडील ७६. अखेर, शेवट ७७. लक्ष्मीपूजनाचा प्रसाद, पेढ्यांऐवजी वाटण्याचा पदार्थ ७८. दया

उभे शब्द : १. निर्णय २. उमर ३. डमरू वाजवताना होणारा आवाज ४. जास्तीत जास्त व कमीत कमी ५. मत देणे ६. मागणीची भुणभुण ७. मयूर ८. लाकूड छिलण्याचे हत्यार ९. ब्राह्मण १०. सिंह १६. जमीनदोस्त १७. मोठी उथळ वाटी १८. सर्वस्व १९. क्वचित २१. लहान २२. रंग, वर्ण २४. धूळ, दुर्दशा २६. सामान्य २७. वाड्यातील मधली खोली २८. चर्चा ३०. जंगलात मजेखातर भटकणे ३१. चाणक्यनीतीतील पहिला उपाय, समजुतीने चर्चा ३३. मध ३४. माजलेला बैल, वळू ३६. निवासस्थान ३७. माणूस ४०. पार्थिव शरीर ४२. आकड्यांनी संख्या लिहिण्याची पद्धत ४३. सुसर ४६. ज्वारीचे वाळलेले खुंट, गुरांचे खाद्य ४७. टकम, दृष्टी ४८. सेनापती, सेनाप्रमुख ४९. पाऊल (हिंदी) ५०. थोर, मोठा ५२. गोष्टी सांगणे ५६. 'खरा तो एकचि धर्म, --- प्रेम अर्पावे' (साने गुरुजी) ५७. संत रामदासांनी मनाला केलेला उपदेश ५९. थकवा ६०. वडील ६१. 'आ'काराची रेघ ६३. लाकूड कापण्याचे हत्यार ६४. सुपारी कातरण्याचे साधन ६५. मारझोड ६६. शिकार ७१. वानवा, नेहमीची बोंब ७२. सडक ७४. आवाज, कीर्ति

### शब्दकोडे-३१४ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.आगबोट ५.पालट ८.खरवस ११.रज १२.पतन १३.लहरबहर १६.साम १७.मारामारी १९.वाचावीर २१.दस्तखत २२.रजक २३.वानवा २४.कली २५.गदा २६.डमरु २८.कसम ३०.बातमीदार ३१.खास ३३.गाळचेपी ३५.माळकरी ३६.सरोवर ३८.कळकळ ४०.गजरा ४१.काना मागून आली ४४.गो ४५.तडक ४७.नटनागर ५१.महाभारत ५३.हाट ५५.अनाथ ५६.जननी ५७.कपबशी ५८.फाटक ५९.जव ६०.कडक ६२.पोरगा ६३.बरकत ६४.पगार ६५.काळा ६६.रगडापुरी ६९.तोरा ७०.लगेच ७२.नवा ७४.बेल ७५.ततपप ७७.वाचक ७८.सरबर ७९.पाणी ८०.दडस ८१.वाढण

**उभे उत्तर**
१.आरमार २.गजराज ३.टपरी ४.धनवान ५.पालवी ६.लहर ७.टर ८.खरखरीत ९.वसा १०.समजदार १४.बदली १५.हस्त १८.माकड २०.चावा २३.वारुळ २४.कमळ २५.गदारोळ २७.मगर २९.सम ।धानकारक ३०.बारीक ३१.खासगत ३२.सरोज ३४.चेतना ३७.वरात ३९.कजाग ४१.काक ४२.मानहानी ४३.लीन ४६.डबी ४८.नाडी ४९.रहाटगाडगे ५०.अनावर ५१.मनकवडा ५२.तपकीर ५४.टक ५५.अजब ५६.जड ५८.फार ६०.कतरबेत ६१.विपरीत ६२.पोळा ६५.कारावास ६७.गल ६८.पुतणी ७०.लकवा ७१.चरण ७२.नस ७३.वार ७६.पद

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# फ्लॅटेड बिल्डिंगमधील उद्योजकांच्या समस्यांवरुन निमाची एमआयडीसी अधिकाऱ्यांसमवेत बैठक



## प्रश्न मार्गी लावण्याचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब झंजे यांचे आश्वासन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सातपुर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक २८ मधील फ्लॅटेड बिल्डिंग मधील रस्ते पूर्णपणे खराब झाले असल्यामुळे रस्त्यांचे डांबरीकरण करणे, ड्रेनेज लाईन करणे, पूर्ण बिल्डिंगला फायर एक्झिट कुठेही नाही त्यामुळे सर्व बिल्डिंगना फायर एक्झिट करणे, पाण्याची पाईपलाईन छतावरून आणि टेरेसवरून असल्यामुळे नळांना गरम पाणी येत येते. त्यामुळे संपूर्ण पाण्याची पाईप लाईन अंडरग्राउंड करणे, दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावर मटेरियल जाण्यासाठी सर्व बिल्डिंगना मटेरियल लिफ्ट बसविणे, तसेच संपूर्ण प्लॉट क्रमांक २८ ला वॉल कंपाऊंड करणे, फायनल लीज डीड यासह तेथील उद्योजकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवरून निमाच्या पदाधिकाऱ्यांनी प्लॉट क्रमांक २८ मधील उद्योजकांसमवेत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांची काल बैठक घेतली.

दरम्यान हे सर्व प्रश्न लवकरच मार्गी लावले जातील, असे आश्वासन एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब झंजे यांनी दिले. या बैठकीत प्लॉट क्रमांक २८ एमआयडीसी सातपुर येथील उद्योजकांच्या बऱ्याच वर्षांपासूनच्या प्रलंबित समस्यांबाबत निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांच्या नेतृत्वाखाली निमाच्या पदाधिकाऱ्यांनी एमआयडीसी अधिकाऱ्यांशी त्यांच्या दालनात भेट घेऊन विविध मुद्यांवर सांगोपांग चर्चा केली.

प्लॉट क्रमांक २८ मधील फ्लॅटेड बिल्डिंगच्या सभासदांना फायनल लीज डीड करणे हा मुद्दा चर्चेला आला. ज्या सभासदांना एमआयडीसी कडून कागदपत्र संदर्भात अथवा लीज डिड संदर्भात काही अडचणी आहेत त्या त्वरित दूर कराव्यात असे निमा पदाधिकाऱ्यांनी सांगितले असता ते पूर्ण करण्याची हमी एमआयडीसीचे एरिया मॅनेजर साळी यांनी दिली. सातपुर मधील औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट क्रमांक २८ येथे एमआयडीसीने चार फ्लॅटेड (गाळा ) बिल्डिंग बांधल्या व उद्योजकांना हे फ्लॅटेड गाळे वितरित केले. नंतर एक पाचवी फ्लॅटेड बिल्डिंग बांधुन तेही गाळे उद्योजकांना वितरित केले. परंतु प्लॉट क्रमांक २८ येथे मुलभुत सुविधा पूर्णपणे न दिल्यामुळे आजही हे सर्व उद्योजक अनेक अडचणींचा सामना करीत आहेत. तसेच सोसायटी हस्तांतरणापूर्वी सर्व कामे पूर्ण करून प्लॉट सुस्थितीत सोसायटीकडे हस्तांतरित करावा यासाठी एमआयडीसी कडे पाठपुरावा करीत असल्याचा मुद्दा प्लॉट क्रमांक २८ च्या सभासदांनी मांडला. सर्व प्रश्नांबाबत तातडीने लक्ष घालून त्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन कार्यकारी अभियंता जयवंत बोरसे आणि उपअभियंता नितीन पाटील यांनी दिले.

चर्चेत निमाचे सचिव राजेंद्र अहिरे, मनिष रावल, हेमंत खोंड, राजेंद्र वडनेरे, अखिल राठी, कैलास पाटील, प्लॉट क्रमांक २८ मधील नितीन आव्हाड, नितीन साळुंके व सर्व सभासद, एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब झंजे, कार्यकारी अभियंता जयवंत बोरसे, उपअभियंता नितीन पाटील, पवार व एमआयडीसीचे एरिया मॅनेजर साळी, तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

# नाशिकमध्ये सरकारणार महाराष्ट्रातील पहिले वातानुकूलित बस स्थानक




## मेळा बस स्थानकाचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्या लोकार्पण

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

राज्यातील पहिले वातानुकिलित बस स्थानक नाशिक येथे सुरू होणार असून उद्या दि.१० फेब्रुवारी रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते मेळा बस स्थानकाचा लोकार्पण सोहळा होणार आहे. १.७३ हेक्टर जागेमध्ये वसलेल्या या बस स्थानकात ६०३३.२२ चौरस मीटर इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. नागरिकांना प्रवेशासाठी स्वतंत्रद्वार असणाऱ्या या बस स्थानकात तळघरात प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

या बस स्थानकात २० फलाट असून यापैकी ४ फलाट वातानुकूलित करण्यात आलेले आहे. नाशिकमध्ये होणारे या बस स्थानकात चालक, वाहक महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र विश्रामगृह करण्यात आलेले आहे. मातांना आपल्या लहान बाळाची काळजी घेता यावी यासाठी स्वतंत्र हिरकणी कक्ष तयार करण्यात आलेला आहे. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र विश्रामगृह तयार करण्यात आलेले आहे. या बस स्थानकात अपंगांना प्रवेश करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली असून अपंगांसाठी स्वतंत्र प्रसाधान गृहे देखील तयार करण्यात आलेले आहे. या बस स्थानकाचा संपूर्ण परिसर रिमिक्स ट्रिमिक्स काँक्रीट करण्यात आलेला असून बस स्थानकात स्वतंत्र वाहतूक नियंत्रण कक्ष महिला व पुरुषांसाठी प्रशस्त प्रसाधन गृह, नागरिकांना अल्पोपहार करता यावा यासाठी उपाहारगृह तयार करण्यात आलेले आहे. नागरिकांना पार्सल देता यावे यासाठी स्वतंत्र पार्सल रूम देखील बस स्थानकात तयार करण्यात आलेली असून सुरक्षेसाठी स्वतंत्र पोलीस चौकी तयार करण्यात आलेली आहे. या अत्याधुनिक बस स्थानकामुळे नाशिक शहराच्या सौंदर्यात वाढ होणार असून नाशिककर नागरिकांनी बस स्थानकाच्या लोकार्पण कार्यक्रमास जास्तीत-जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आमंत्रण आमदार देवयानी फरांदे यांनी दिलेले आहे.

# रविवारी नाशकात नमो मॅरेथॉन

**नाशिक ।** भारतीय जनता युवा मोर्चा आयोजित नमो चषक अंतर्गत नाशिक पुर्व विधानसभा मतदार संघाचे आमदार ड.राहुल ढिकले यांच्या माध्यमातून रविवार, ११ फेब्रुवार रोजी सकाळी ६ वाजता आरटीओ कॉर्नर, मेरी ते आरोग्य विज्ञान विद्यापीठ या मार्गावर नमो मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये वय वर्षे १६ वर्षाखालील स्पर्धकांना ५ किलो मीटर, खुला गट १० किलो मीटर व वरिष्ठ गट वय वर्षे ४० वर्षांपुढील स्पर्धकांना ५ किला मीटर अंतर असेल या मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी परोलहरीहरज्ञ.ळप या लिंक वर ऑनलाईन नोंदणी करावी सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून दोन लाख रुपये रकमेची रोख बक्षीसे देण्यात येणार आहे.

## उद्या नाशिकमध्ये सुरक्षित भारत एफएसएआय बॉक्स क्रिकेट लीग

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

फायर अँड सिक्यूरिटी असोसिएशन ऑफ इंडियाच्या नाशिक चॅप्टर तर्फे उद्या शनिवारी ( दि. १०) सुरक्षित भारत एफएसएआय बॉक्स क्रिकेट लीग - सिझन ६ चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजता विश्वास लॉन्स टर्फवर स्पर्धे ला प्रारंभ होईल अशी माहिती अध्यक्ष वरुण तिवारी, सचिव हर्षद भामरे व प्रकल्प प्रमुख अभिषेक अयाचित यांनी दिली.

आयमाचे सरचिटणीस प्रमोद वाघ, डॉ.निलेश कुलथे, आरजे वैदेही, गायक भूषण कापडणे यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता स्पर्धेचे उदघाट्न करण्यात येणार आहे. या क्रिकेट स्पर्धेत एमआयडीसी नाशिक व पुणे, क्रेडाई, इशरे, आर्किटेक्ट व इंजिनिअर्स असोसिएशन, नाशिक महापालिका अग्निसुरक्षा विभाग आदी संघटनांचे संघ सहभागी होणार आहेत. सायंकाळी स्पर्धा संपल्यावर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण केले जाईल.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी नॉर्बर्ट डिसुझा, आनंद दीक्षित, संजीव जगताप, मनोज कर्डीले, किरण नवले, अनिल शिंपी, जालिंदर मूर्तडक, प्रसाद वाणी, सागर देवरे, कैलास डोंबे, श्रुतकीर्ती बेडेकर, दीपक दंडगावकर, सई मोने - पाटील, गजेंद्र जगताप आदी परिश्रम घेत आहेत.

# नाशिक महापालिकेचा आजपासून पुष्प महोत्सव

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नाशिक महापालिकेमार्फत सन १९९६ पासून पुष्पोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी नाशिक महानगरपालिकेने दि.९ ते ११ फेब्रुवारी दरम्यान पुष्पोत्सव २०२४ आयोजनाचे केले असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या आयोजनात काल दि.९ रोजीपर्यंत विविध गटात स्पर्धकांमार्फत सुमारे १७९७ प्रवेशिका आल्या असून काल सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्पर्धकांना स्पर्धेत भाग घेण्याचा अवधी आहे. नर्सरी व फुड स्टॉल देखिल पुष्पोत्सवात असुन सर्व ४२ नर्सरी स्टॉल व २० फुड स्टॉलचे बुकींग झाले आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

प्रवेशद्वारावर फुलांची आकर्षक कमान उभारण्यात येणार असून प्रांगणात सेल्फी पॉईंट उभारण्यात आले आहे. प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण मिनीएचर लॅन्डस्केपींग, कार्यालयाच्या तीनही मजल्यावर विविध गटाची मांडणी असणार असून या विविध गटामध्ये गुलाबपुष्पे, मोसमी फुले, फळे, भाजीपाला, हार, बुके, पुष्परचना, बोन्साय, कॅक्टस, शोभिवंत कुंडया ठेवल्या जाणार आहेत. पुष्पोत्सव २०२४ चे उद्घाटनाचा कार्यक्रम आज दि.९ रोजी पालकमंत्री दादाजी भुसे, मंत्री यांच्या हस्ते सायंकाळी ४ वाजता होणार असून त्यांच्या हस्ते मानांकनाच्या ट्रॉफीजचे वितरण होईल.

## साक्री नगरपंचायत, साक्री जि.धुळे
## जाहीर निविदा सूचना

जावक क्रं./सा.प्र.१५८/२०२४ दिनांक :- ०८/०२/२०२४

सर्व नोंदणीकृत / सक्षम पुरवठादार / ठेकेदार यांना कळविण्यात येते की, साक्री नगरपंचायतीकडील सामान्य प्रशासन विभागा करीता खालील कामासाठी ऑफलाईन पध्दतीने निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक पुरवठादार / ठेकेदार यांनी द्विलिफाफा पध्दतीने अंतिमत: दिनांक १५/०२/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपावेतो आपले दरपत्रके/ निविदा साक्री नगरपंचायत मध्ये कार्यालयीन वेळेत मोहोरबंद लिफाफ्यात सादर कराव्यात. निविदेच्या अटी व शर्ती तसेच सविस्तर निविदा सूचना नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | निविदा प्रपत्र फी |
|---|---|---|
| १ | साक्री नगरपंचायत कार्यालयासाठी नवीन वॉटर फिल्टर विथ चिलर प्युरीफायर व अनुषंगिक साहित्य पुरविणे. | २०० |
| २ | नामांकीत कंपनीचे १,२,३, ५ व ७ एच.पी. क्षमतेचे सबमर्सिबल पंप व अनुषंगिक साहित्य पुरविणे. | २०० |

**अटी व शर्ती**
१) उशिरा आलेल्या भावपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२) निविदा स्विकारणे/नाकारणेचा अधिकार नगरपंचायतने राखुन ठेवला आहे.
३) वरील प्रमाणेचे कामासाठी कोणतेही अग्रीमधन पुरविले जाणार नाही.

**सही**
**मुख्याधिकारी**
**साक्री नगरपंचायत, साक्री जि. धुळे**

**ॲड. अश्विन डी. देवरे**
**नि.६**

## जाहीर नोटीस
### धुळे येथील मे. सिव्हील जज्ज सो जे. डी. यांचे कोर्टात

**दि. कि. अर्ज क्र. १४९१/२०२३**

संजय दयाराम देवरे, वगैरे ..... अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ....... जाबदेणार

याआर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. २ सो. धुळे यांचे कडे कि. दि. अर्ज. नं. १४९१/२०२३ चा अर्ज कै. दयाराम तानाजी देवरे यांचे कायदेशीर वारस आहेत दयाराम तानाजी देवरे मयत याचे नावे असलेली मौजे दहयाणे ता. जि. धुळे येथील शेत जमीन गट नं. ११९/१ चे क्षेत्र ० हे. ४९.५० आर या शेतमिळकतीवर अर्जदार यांचे वारस म्हणून नाव लावण्याकरिता सदरचा अर्ज हा दाखल केलेला आहे. शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस दाखल मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.०५/०३/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. २ सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०१/०२/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, धुळे**
**(सहाय्यक अधीक्षक)** — **दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, धुळे**

**ॲड. अजय एस. सानप**
**नि.६**

## जाहीर नोटीस
### धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात

**दि. कि. अर्ज न१४९४/२०२३**

१. सुनिताबाई दगा साबळे, उ. व. ५४ वर्ष, धंदा -घरकाम,
२. विवेक दगा साबळे, उ. व. ३४ वर्ष, धंदा-नोकरी
३. प्रतिक दगा साबळे उ. व. ३२ वर्ष, धंदा - नोकरी, नं. १ से ३ रा. पंचवटी गल्ली, मु. पो. खेडे (आनंदखेडे), ता. जि. धुळे ......अर्जदार
आणि
१. मा. शाखाधिकारी सो,
स्टेट बँक ऑफ इंडिया, जिल्हा परिषद समोर, धुळे, ता. जि. धुळे
२. मा. शाखाधिकारी सो,
स्टेट बँक ऑफ इंडिया, वलवाडी, ता. जि. धुळे.
३. मा. शाखाधिकारी सो,
युनियन बँक ऑफ इंडिया, धुळे, ता. जि. धुळे
४. मा. शाखाधिकारी सो, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. कुसुंबा, ता. जि. धुळे ... सामनेवाला
दगा नारायण साबळे (मयत) मृत्यु दि. १८/०८/२०२३,
मृत्यु ठिकाण: नाशिक .....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात दगा नारायण साबळे (मयत) यांचे नावे खालील नमुद रक्कमांचा तपशिल:

१) स्टेट बँक ऑफ इंडीया, मुख्य शाखा धुळे, खाते क्र. बचत खाते क्र. १०८६६७२४१४०
शिल्लक रक्कम - एकुण रक्कम रू. ३,९१,१५०/- (अक्षरी रू. तीन लाख ऐक्यानव्व हजार एकशे पन्नास मात्र) व त्यावरील व्याज

२) स्टेट बँक ऑफ इंडीया, मुख्य शाखा धुळे, बचत खाते क्र. १०८६६६३१०५१
शिल्लक रक्कम -एकुण रक्कम रू. ९७,१५८.६९/- (अक्षरी रू. सत्यानव्व हजार एकशे अठ्ठावन्न रूपये एकोणसत्तर पैसे मात्र) व त्यावरील व्याज

३) स्टेट बँक ऑफ इंडीया, मुख्य शाखा, धुळे, मुदत ठेव खाते क्र. ३०११३५६१०२४
शिल्लक रक्कम -एकुण रक्कम रू. ९४,४१८/- (अक्षरी रू चौऱ्यानव्व हजार चारशे अठरा मात्र) व त्यावरील व्याज

४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा वलवाडी, धुळे, मुदत ठेव खाते क्र. ३०५१७६०८८०५
शिल्लक रक्कम -एकुण रक्कम रू. ५३,५०७/- (अक्षरी रू) त्रेपन्न हजार पाचशे सात मात्र) व त्यावरील व्याज

५) स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा वलवाडी, धुळे, मुदत ठेव खाते क्र. ३०७४८१९३५६६
शिल्लक रक्कम -एकुण रक्कम रू. १,३१,७००/- (अक्षरी रू. एक लाख एकतिस हजार सातशे मात्र) व त्यावरील व्याज

६) युनियन बँक ऑफ इंडीया, शाखा, धुळे, बचत खाते क्र. ३२४००२०१०००८७९३
शिल्लक रक्कम -रक्कम रू. एकुण ३,१०,४२३१०/- (अक्षरी रू. तीन लाख दहा हजार चारशे तेविस रूपये दहा पैसे मात्र) व त्यावरील व्याज

७) धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. धुळे शाखा,बचत खाते क्र. ०१६३६०१०००१६७०२
शिल्लक रक्कम - एकुण रक्कम रू. १८,४३७/- (अक्षरी रू) अठरा हजार चारशे सदोतीस मात्र) अठरा त्यावरील व्याज वरील रक्कमा व त्यावरील व्याजासह मिळावी म्हणुन सक्सेशन सर्टिफिकेट मिळावे म्हणून दि.२०/१२/२०२३ रोजी दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि१४/०३/२०२४ ही निश्चित केली आहे त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं.-, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ७/२/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे**
**(अधीक्षक)** — **दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे**

**ॲड. अतुल अरूण जगताप**
**नि.६**

## जाहीर नोटीस
### धुळे येथील मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांचे न्यायालयात

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. २०५/२०२४**

श्रीमती. पुष्पाबाई श्रीराम क्षिरसागर ......अर्जदार
विरूध्द
कै. श्रीराम चिंधु उर्फ चिंतामण क्षिरसागर (मयत) ...जाबदेणार

ज्याअर्थी की, कै. श्रीराम चिंधु उर्फ चिंतामण क्षिरसागर हे अर्जदार नं. श्रीमती. पुष्पाबाई श्रीराम क्षिरसागर यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २. श्रीमती. कविता शरद शेलार यांचे पिता आहे तसेच ३. श्री. सुरेश श्रीराम क्षिरसागर याचे पिता आहे. कै. श्रीराम चिंधु उर्फ चिंतामण क्षिरसागर यांचे दि. २६/०९/२०१२ रोजी मौजे धुळे ता. जि. धुळे येथे निधन झालेले आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांना शासकीय व निमशायकीय विविध कार्यालयातील कामांन करिता वारस तक्त्याची / दाखल्याची नितांत तातडीची गरज आहे त्यामुळे अर्जदार नं. १ ते ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. १२/०३/२०२४ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक - ५/२/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्या. व. स्तर, धुळे**
**(अधीक्षक)** — **दिवाणी न्या. व. स्तर, धुळे**

**ॲड. विशाल बी. पाटील**
**नि.६**

## जाहीर नोटीस
### धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व स्तर यांचे न्यायालयात

**दि.कि. अर्ज नं २२७/२०२४**

१. रत्नाबाई चंद्रशेखर गोसावी, उ. वय ४५ वर्षे, धंदा :- घरकाम रा. घर नं. १, सुशी नालाजवळ, आग्रा रोड, विटाभट्टी देवपुर, ता. जि. धुळे ....अर्जदार
-: विरुध्द :-
कोणीही नाही ...सामनेवाला
कै. चि. जयेश चंद्रशेखर गोसावी, मृत्यु दिनांक ३०/११/२०२३ (मयत)

ज्या अर्थी अर्जदार क्र. १ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर धुळे यांच्या न्यायालयात दि. ३-२-२४ रोजी दि.कि. अर्ज नं. २२७/२४ चा वारस दाखला (Legal Heir Certificate) मौजे कुसुंबा ता.जि. धुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे कायदेशीर वारस ठरवुन मिळण्याकरीता सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालवण्याकरीता पुढील चौकशी दि.१३/०३/२०२४ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दि. १३/०३/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजेचा सुमारास में. कोर्टात व्यक्तीशः व आपल्या वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे / हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक : ६/२/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **सह न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे**
**(अधीक्षक)** — **सह न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे**

**ॲड. अनिल किसन गवळी**
**नि.६**

## जाहीर नोटीस
### धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो धुळे यांचे कोर्टात.

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.१९५/२०२४**

प्रमिला बापू माळी . ....अर्जदार
।। वि.।।
कोणीही नाही ...... जाबदेणार
कै. बापू गोरख माळी ...... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. धुळे यांचे कडे दि. ३०/१/२०२४ रोजी कि.दि.अर्ज नं. १९५/२०२४ चा अर्ज कै.बापू गोरख माळी रा. माळी वाडा, मु.पो कापडणे ता.जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. बापू गोरख माळी यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. १९/०३/२०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. २ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि. ६/०२/२०२४ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**
**(अधीक्षक)** — **दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**

## न्यूज कॉलम

### संशयितरित्या फिरणारा ताब्यात

**धुळे ।** साक्री तालुक्यातील निरगुडीपाडा परिसरात तोंडाला रूमाल बांधुन संशयितरित्या फिरणार्या तरूणास पिंपळनेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोकॉ कैलास कोळी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,मध्यरात्री १२.५० च्या सुमारास निरगुडीपाडा परिसरात विजय साहेबराव चौरे, (१९) रा.वडपाडा, पो.पिंपळगाव, ता.साक्री हा तोंडाला रुमाल बांधुन संशयितरित्या फिरतांना आढळून आला. या फिर्यादीवरून पिंपळनेर पोलीस ठाण्यात विजय चौरे याचेविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

### ब्राह्मणवेल शिवारातून कॉपर वायर लंपास

**धुळे ।** ब्राह्मणवेल (ता. साक्री) शिवारातील टॉवरमधून चोरट्यांनी ६० हजारांची कॉपर केबल लंपास केली. ही घटना २९ जानेवारीला पहाटे दोन ते तीनदरम्यान घडली. याबाबत सुरक्षारक्षक प्रशांत सोनवणे यांच्या तक्रारीनुसार निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला.

### आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयाला पुस्तके भेट

**दोंडाईचा ।** आर. सी. पटेल उर्दू माध्यमिक विद्यालयाला पुस्तके भेट देण्यात आले. तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये अवांतर पुस्तक वाचण्याची गोडी कमी झालेली आहे. त्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले जात आहेत. याच पार्श्र्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी आर.सी.पटेल उर्दू माध्यमिक विद्यालयाला श्रीमती बदरून्नीसा इरफानोद्दीन शेख (माजी मुख्याध्यापिका म.न.पा. शाळा क्रमांक २६ धुळे) यांनी ग्रंथालयासाठी एकूण ४ हजार रुपये किमतीची पुस्तके भेट दिली.

# जि. प. पदाधिकारी, अधिकारी, कर्मचार्‍यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे थाटात उद्घाटन

### जि. प. अध्यक्षा धरती देवरे यांच्यासह अधिकारी धावले

**धुळे । प्रतिनिधी**





जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचार्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आज थाटात उद्घाटन करण्यात आले. क्रीडा ज्योत प्रज्वलन, ध्वजारोहण व पथसंचालनाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. शंभर मिटर धावण्याच्या स्पर्धेत जि.प.च्या अध्यक्षा धरती देवरेंसह अधिकारी व पदाधिकारी देखील सहभागी झाले होते. तर अफजलखान वधाच्या थरारक प्रात्याक्षिकाने उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः क्षहारे आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांची भुमिका जि.प.चे कर्मचारी मुकेश ठाकुर यांनी तर दिनेश महाले यांनी अफजल खानाची भुमिका साकारली. या दोघांच्या कलेचे सीईओंसह उपस्थितांनी जोरदार स्वागत केले.

यावेळी जि.प.च्या अध्यक्षा सौ. धरती देवरे, जि.प.चे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जि.प.च्या महिला बालकल्याण सभापती संजीवनी सिसोदे, शिक्षण व आरोग्य सभापती महावीरसिंग रावल, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, महिला बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी हेमंतराव भदाणे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सीईओ शुभम गुप्ता यांनी सर्व अधिकारी, कर्मचार्यांसह पदाधिकार्यांना स्पर्धेत सहभागी होण्याची आवाहन केले. तर जि.प.अध्यक्षा देवरे यांनी आम्ही स्पर्धेत सहभागी होवू आणि जिंकून दाखवू, असा विश्वास व्यक्त केला. आज सकाळी १०० मीटर व दोनशे मीटर धावणे, रस्सीखेच, गोळा फेक, लांब उडी, थाळीफेक, लिंबू चमचा, भालाफेक या स्पर्धा पुरुष व महिला गटासाठी घेण्यात आल्या. तर दुपारच्या सत्राते कॅरम, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कबड्डी, रायफल शूटिंग, टेबल टेनिस, खो-खो, चालणे या स्पर्धा होणार आहे. त्यानंतर शेलापागोटे, मनोरंजन, हास्य विनोद कार्यक्रम तसेच सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजेपासून विविध स्पर्धांना सुरुवात होईल. यामध्ये खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल तसेच जलतरण स्पर्धा पुरुष आणि महिला गटात होतील. दि.१० रोजी कबड्डी, खो-खो, क्रिकेट आणि हॉलीबॉल स्पर्धेचे अंतिम सामने होणार आहेत. दुपारी दोन ते पाच या दरम्यान विविध क्रीडा प्रकारात पारितोषिक मिळविणार्या खेळाडू आणि संघांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणार्या अधिकारी, कर्मचार्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण केले जाणार आहे.

# निवडणूक आयोगाच्या निकालानंतर राष्ट्रवादी भवनात आनंदोत्सव साजरा



**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार हेच असून पक्षाचे नाव व चिन्ह त्यांचे असल्याचा निकाल दिल्याने नाशिक येथील राष्ट्रवादी भवन येथे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत फटक्यांची आतिषबाजी व पेढे वाटप करून ढोल-ताशाच्या तालावर ठेका धरत जल्लोष करण्यात आला.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष नानासाहेब महाले, जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, महिला शहाराध्यक्षा योगिता आहेर, सामाजिक न्याय प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब कर्डक, युवक जिल्हाध्यक्ष चेतन कासव आदी उपस्थित होते. निवडणूक आयोगाच्या निकालानंतर नाशिक शहरातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी भवन येथे एकत्र होऊन ढोल-ताशाच्या तालावर ठेका धरत व फटक्यांची आतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी 'एकच वादा - अजित दादा' 'महाराष्ट्र की बुलंद आवाज..अजीत पवार' अशा घोषणा देण्यात आल्या.

याप्रसंगी प्रदेश पदाधिकारी निर्मला सावंत, ऋषिकेश पिंगळे, रोहित पाटील, विभाग अध्यक्ष मनोहर कोरडे, मकरंद सोमवंशी, शंकर मोकळ, प्रशांत वाघ, कविता कर्डक, जगदीश पवार, योगेश दिवे, राजेश भोसले, अमोल नाईक, मुकेश शेवाळे, डॉ. संदीप चव्हाण, निलेश भंदुरे, संदीप गांगुर्डे, संदीप खैरे, संतोष भुजबळ, राहुल पाठक, रेहान शेख, अक्षय परदेशी, वैशाली ठाकरे-वायगंकर, रूपाली पठाडे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संतांच्या विचारांमुळेच विश्वबंधुत्वाला चालना मिळेल : डॉ. बाजीराव पाटील

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सध्याच्या विश्र्वाचा विचार केला तर प्रत्येक व्यक्ती स्वार्थीपणाने जीवन जगत आहे प्रत्येक जण स्वतःचा विचार करत असल्याने विश्र्वबंधुत्व धोक्यात आलेले आहे आणि हे जर आपणास पूर्ववत करायचे असेल तर संतांच्या विचाराची कास आपणास धरावी लागेल त्यासाठी शालेय शिक्षणापासून संतांच्या मूल्य शिक्षणाचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये करून संतांचे विचार बालमनापासूनच विद्यार्थ्यांवरती बिंबवल्यास खरोखरच विश्र्वबंधुत्व निर्माण होईल असे मत ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अंमळनेर येथील भारतीय तत्त्वज्ञान एक वैभवशाली संस्कृती या तत्त्वज्ञानाच्या परिसंवादामधील भारतीय संत परंपरा व विश्र्वबंधुत्व या विषयावरती बोलताना व्यक्त केले. प्रा डॉ राधिका पाठक अमळनेर यांनी भक्ती मार्गाचा विकास व आदर्श जीवन हा विषय घेऊन आपले विचार व्यक्त केले परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी फलटण येथील प्रा डॉ नवनाथ रासकर हे होते. साहित्य संमेलनामध्ये पहिल्यांदाच तत्त्वज्ञानावरती परिसंवाद ठेवण्यात आल्याने कार्यकारणीचे आभार मानले तर भविष्यात देखील तत्त्वज्ञानाच्या अशा परिसंवादासाठी व्यासपीठ निर्माण करून देण्याची विनंती यावेळी त्यांनी केली तत्त्वज्ञान सर्व समस्या वरती उपाय शोधून काढतं म्हणून प्रत्येकाने तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे असा विचार अध्यक्षीय समारोपातून केला.

# पालेशा महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे एज्युकेशन सोसायटीच्या मा ध पालेशा वाणिज्य महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर दत्तक गाव बिलाडी तालुका जिल्हा धुळे येथे दिनांक ६ फेब्रुवारीपासून सुरू आहे. आज दिनांक ७ फेब्रुवारी फेब्रुवारी रोजी या शिबिरांतर्गत रक्तदान शिबिर घेण्यात आले.

महाराष्ट्र शासनाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग मुंबई शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय धुळे शासकीय रक्त केंद्र धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यांचे सोबत डॉ समृध्दी ठाकरे सहाय्यक प्राध्यापक श्री चंदुलाल साठे समाजसेवक अधिक्षक श्री संजय चौधरी रक्तपेढी तंत्रज्ञ श्री हंसराज बागुल रक्तपेढी तंत्रज्ञ श्री अक्षय माळी अधिपरीचारक श्री सिध्दार्थ भामरे रक्तपेढी परिचर कु कल्याणी पाटील प्रशिक्षणार्थी कु नेहा पाडवी प्रशिक्षणार्थी कु अनिता वामासूर्यवंशी प्रशिक्षणार्थी हे रक्तपेढी पथक उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात एकूण १८ व्यक्तींनी रक्तदान केले.



**यांनी केले रक्तदान**

**यामध्ये डॉ. हेमंत जोशी, एम.एम.मून, पल्लवी वाळके, ज्ञानेश्र्वर भरत नागपुरे, आत्माराम जाधव, स्नेहा प्रकाश शेलार,हेमांशू भगवान गवळे,वंश शाह, भूमिका मणीलाल जोशी, देवेंद्र राजेंद्र पाटिल, पूजा संजय वाघ, तेजस्विनी दाभाडे, प्रिया राजू लिंगडे,अश्र्विनी बबन जगताप,लोकेश उदय कुलकर्णी,वैभव जितेंद्र सोनवणे, दीप चिराग खीलोसिया,कैलास जगन्नाथ वाणी यांनी रक्तदान केले.**

# लाटीपाडा धरणाच्या उजव्या कालव्याद्वारे एक आवर्तन सोडावे : देसले

**साक्री । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



उन्हाळ्याची चाहुल लागण्यापुर्वी काटवान भागातील नागरिकांना भीषण पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. विहिरींनी देखील तळ गाठला आहे म्हणून लाटीपाडा धरणातून उजव्या कालव्याद्वारे एक आवर्तन सोडावे, अशी मागणी उबाठा शिवसेना तालुका प्रमुख विशाल देसले यांच्या नेतृत्वात तहसीलदार साहेबराव सोनवणे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, यंदा कमी प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्याने काटवान भागातील छाईल, नाडसे, दारखेल, निळगव्हाण, बेहेड, विटाई या गावांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. काटवान परिसरातील विहीरींनी देखील तळ गाठला आहे. गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा व गावातल्या रहिवाशांच्या पिण्याच्या पाण्याचा साठा संपुष्टात आला आहे. याकरीता ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच यांनी पाण्यासाठी आरक्षण देखील जिल्हाधिकार्यांकडे नोंदवलेला आहे. आता उन्हाळ्याची सुरूवात झाली आहे.

यावेळी निवेदन देताना उपजिल्हाप्रमुख विशाल दिसले, उपजिल्हाप्रमुख मनु गावीत, तालुकाप्रमुख अमोल सोनवणे, तालुका संघटक अभय शिंदे, युवा सेना तालुकाप्रमुख मंगलदास सूर्यवंशी, शिवसेना माजी उप तालुकाप्रमुख बाळा देवरे, उपतालुका प्रवीण तोरवणे, निलेश कुवर, प्रशांत कुवर, विभाग प्रमुख विशाल भामरे, निवृत्ती हिरे, दीपक खैरनार, मयूर अहिरे, राधे पाटील, अविनाश मोरे, किरण बहिरम आदींची उपस्थिती होती.

### विषप्राशन करून युवतीची आत्महत्या

**दोंडाईचा ।** २२ वर्षीय युवतीने विषप्राशन करून आत्महत्या केल्याची घटना मालकातर (ता. शिरपूर) गावात घडली. सांगवी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. सोनाली कादऱ्या पावरा (वय २२, रा. मालकातर) असे मृत युवतीचे नाव आहे. तिला घरी ठेवून २१ जानेवारीला बहीण, आई, मेहुणा शेतात गेले होते. दुपारी ते घरी परत आल्यावर सोनालीने आईस तिने विषप्राशन केल्याचे सांगितले. तिला पानसेमल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# ॲड. संभाजी पगारे लिखित ' हळवे हुंकार मनाचे'काव्य संग्रहाचे ११ फेब्रुवारीला धुळे येथे प्रकाशन

**सामोडे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

प्रसिद्ध कायदेतज्ञ शिक्षण महर्षी मराठी हिंदी इंग्रजी भाषेतून प्रबोधन करणारे सगररत्न गावकुसाच्या मातीतील अस्सल ग्रामिण कवी लेखक ड संभाजी यशवंत पगारे पिंपळनेरकर यांच्या हळवे हुंकार मनाचे ज्ञानसिंधु प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला काव्य संग्रह प्रकाशनासाठी सज्ज झाला असुन पंडीत दिनदयाल उपाध्याय पुण्यस्मरण दिनाच्या औचित्यावर ११ फेब्रुवारी २०२४ रोजी धुळे येथील धोंडो शामराव गरुड वाचनालय जेलरोड येथे होणार आहे.

यावेळी प्रसिद्ध साहित्यिक अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे मा.अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षते खाली व मा. पुष्पराज गांवडे युवा कांदबरीकार स्तंभ लेखक तथा महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ सदस्य मुंबई तसेच प्रा. डॉ. सदाशिव सुर्यवंशी धुळे मा. प्रा. डॉ. फुला बागुल शिरपूर व विविध क्षेत्रातले साहित्यिक कवी लेखक यांच्या प्रमुख उपस्थितीत दुपारी दोन वाजता थाटात प्रकाशन सोहळा संपन्न होणार असुन ह्या सोहळ्यास राज्यातून अनेक दिग्गज कवी लेखक साहित्यिक उपस्थित राहाणार आहेत. नेत्रदिपक वैचारिक मेजवानीने पार पडेल अशी माहिती प्रकाशन सोहळा संयोजन कमेटीचे पगारे परिवार पिंपळनेर धुळे तसेच महात्मा फुले शिक्षण प्रसारक संस्थेच्या सचिव सौ. पुष्पलता पगारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# वाघाडी येथील सीबीएसई स्कूल मध्ये वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित वाघाडी येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूल मध्ये वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल होते. संस्था उपाध्यक्ष चिंतनभाई अमरिशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, सीए अनुप शिंपी व अनेक मान्यवर उपस्थित होते.

सर्व प्रमुख अतिथींच्या हस्ते श्री गणेश, माता सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. भूपेशभाई पटेल, राजगोपाल भंडारी, चिंतनभाई पटेल यांचा सत्कार विविध रोपे देऊन करण्यात आला. कार्यक्रमाला विविध शाखांचे प्राचार्य निश्र्चल नायर, डॉ.अमोल परब, जॉन लॉरेन्स, निलेश चोपडे, के. जे.राजपूत, गिरीश पाटील, स्मिता पंचभाई, भूमिका गर्ग, मनीषा अँड्रेस, सपना मराठे, मधुबाला चंदेल, रोजमोल एन्ड्रियास, लिटिल एंजल्स स्कूलच्या मिसेस अग्रवाल, विविध गावातील आजी-माजी सरपंच, पदाधिकारी उपस्थित होते. त्यानंतर ज्युनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी पालकांना कार्यक्रमाविषयी सूचना दिल्या. यानंतर विद्यार्थ्यांनी प्रेरणा गीत सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

# मेट इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीच्या तीन विद्यार्थी संघप्रमुखांची निवड

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

स्टेप आणि डिस्क या संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने दिल्या जाणाऱ्या नाशिक डीसट्रीकट् फेलोशिप साठी मेट इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, भुजबळ नॉलेज सिटी नासिकच्या तीन विद्यार्थी संघप्रमुखांची निवड झाली आहे.

या स्पर्धेमध्ये नासिक जिल्यातील तब्बल ८० विदयार्थी संघ सहभागी झाले होते. ज्यात नाशिक जिल्ह्याला पैठणीचं गाव म्हणून प्रस्थापित करायचे, अशा लोकांमध्ये जे साडी घेण्यास फार उत्सुक नाहीयेत हे चॅलेंज स्टेटमेंट विद्यार्थ्यांना देण्यात आलं होतं. याकरिता त्यांना प्रथम फेरीसाठी एक प्रेझेंटेशन द्यायचं होतं ज्यामध्ये या प्रॉब्लेम स्टेटमेंटसाठी त्यांना शक्य असणारे उपाय योजना सांगावयाची होती. पहिल्या फेरीमधून संपूर्ण नाशिक जिल्यातुन सहभागी झालेल्या शिक्षणसंस्थांमधील ११ संघाना शॉर्टलिस्ट करण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या फेरीसाठी त्यांना पुन्हा एकदा याच विषयावर एक प्रेझेंटेशन द्यावं लागलं. ज्यामध्ये त्यांच्या मधील इनोव्हेटिव्ह माइण्डसेट, उपाययोजना आखताना त्यांच्यामध्ये असलेली हुशारी जोखण्यात आली. कोणता संघ हा योग्य उपाययोजना सांगतो, जी प्रत्यक्षामध्ये अंमलात आणता येऊ शकते यावर संघांची निवड करण्यात आली. मेट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयामधील सुवार्ता वाकचौरे, जयश्री भदाणे ( द्वितीय वर्ष बीफार्म ), हितेश गांगुर्डे, संस्कृती आहेर ( तृतीय वर्ष बीफार्म), करण बिडवे, सोहम जोशी, गायत्री कोतवाल, अक्षता जाधव ( तृतीय वर्ष फार्म डी) या तीन संघांची या फेलोशिपसाठी निवड झाली.

# नवप्रविष्ठ पोलीसांनी कर्तव्यासोबत कायद्याचे पालन करावे : जिल्हाधिकारी गोयल

### पोलीस प्रशिक्षणार्थींचा दीक्षांत संचलन सोहळा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्र पोलीस दलात नवप्रविष्ठ झालेल्या पोलीसांचा समाजात वावरत असतांना जनतेशी प्रत्यक्ष संबंध येणार आहे. आपण आपले कर्तव्य व कायद्याचे पालन या दोन्ही गोष्टींची सांगड घालुन जनतेच्या भावनेचा आदर करत कर्तव्यासोबत कायद्याचे पालन करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आज नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थींच्या १० व्या दीक्षांत संचलन सोहळ्यात केले.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे येथे सत्र क्रमांक १० मधील ६२७ नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थींचा दीक्षांत समारंभ येथील कवायत मैदानावर संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गोयल बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सहायक पोलीस अधिक्षक एस.ऋषीकेश रेड्डी, उपवनसंरक्षक नितिन सिंग, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजय पवार, राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस उपअधिक्षक चंद्रकांत पावसकर, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ६ चे पोलीस उपअधीक्षक प्रदीप पारखे, गुलाबराव खर्डे, उपप्राचार्य रामकृष्ण पवार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे येथे राज्यातील विविध घटकातून आलेल्या



प्रशिक्षणार्थींनी आज येथे मुलभूत प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले आहे. परंतू त्यासाठी आपण आपल्यामध्ये जिद्द, चिकाटी मिळालेल्या संधीचे सोने करण्याची पात्रता निर्माण केली पाहिजे. त्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करण्याची गरज आहे. भविष्यात कुटूंबाकडे, मुलांकडे लक्ष द्या यासोबत आपले कर्तव्यही तेवढेच प्रामाणिकपणे व निष्ठेने सांभाळावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

पोलीस प्रशिक्षण केंन्द्राचे प्राचार्य श्री.पवार म्हणाले की, धुळे पोलीस प्रशिक्षण केंद्र हे महाराष्ट्रातील निरनिराळया जिल्ह्यातून पोलीस दलात प्रवेश करणाऱ्या पोलीस शिपाई यांना मुलभूत प्रशिक्षण देण्यासाठी १६ एप्रिल २०१० पासून हे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रात आजपर्यंत ८८२ कवायत निदेशक यांना १२ सत्रात यशस्वी प्रशिक्षण देण्यात आले असून सदर कवायत निदेशक हे महाराष्ट्र राज्यातील विविध पोलीस प्रशिक्षण संस्था येथे व घटकात नव्याने नियुक्ती व भरती झालेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बाह्यवर्गाचे उत्कृष्ठ प्रशिक्षण देवून सक्षम अधिकारी व अंमलदार घडवित असतात. या संस्थेत आजपर्यंत ९२४ नवप्रविष्ठ महिला पोलीस शिपाई व २ हजार १९० पुरुष पोलीस शिपाई असे एकूण ३ हजार ११४ यांनी मुलभुत प्रशिक्षण घेतले आहे. तसेच १ हजार ३५ नवप्रविष्ठ पुरुष, महिला, होमगार्ड यांनी राज्याच्या विविध घटकातून प्रशिक्षण घेतले आहे. राज्यातील विविध घटकातून १ हजार ८२१ पोलीस उपनिरीक्षक यांना तसेच १० वर्ष व २० वर्ष पोलीस दलात सेवा झालेले पोलीस अंमलदार यांच्याकरीता प्रोफेशनल स्कील अपग्रेडेशन, २ हजार ३५ प्रशिक्षणार्थींना कायद्याचे ज्ञान व प्रात्याक्षिक देण्यात आले आहे.असे एकूण ८ हजार ८८७ प्रशिक्षणार्थींना आजपर्यंत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# शिरपूर नगरीत जैन भगवती दिक्षा निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शिरपूर शहरातील सुश्रावक, सामाजिक कार्यकर्ते, नवनीत राखेचा तथा सुश्रावीका सौ. ज्योती राखेचा यांची सुकन्या मुमुक्ष दिक्षार्थी नेहा राखेचा (२९ वर्षे) ह्या दि. १७ फेब्रुवारी रोजी राजस्थान राज्यातील निंबाहेडा येथे आचार्य भगवंत १००८ परमपूज्य श्री रामलालजी महाराज यांच्या मुखारविंद ने जैन भागवती दिक्षा ग्रहण करणार असल्याचे राखेचा यांनी सांगितले.

दिक्षा सोहळा निमित्त सकल जैन समाजाने शिरपूर शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. याप्रसंगी बहु मंडळ, महिला मंडळ, कन्या मंडळ नाटिका व नृत्य तसेच परखड संयम मार्गाचे असे नाना तऱ्हेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या तयारी करण्यात बालक बालिका, महिला, युवा मंडळ व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. ११ रोजी समता शाखेतर्फे सकाळी साडेसात सुरुवात होईल व प्रवचनाला सकाळी पऊने नऊ वाजता, सांस्कृतिक कार्यक्रम, वीर माता पिता सन्मान समारोह व रक्षाबंधन आणि सायंकाळी साडेसहा वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



# धुळे जिल्हा परिषदेचे क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना सुरुवात

## शंभर मिटर धावण्याच्या स्पर्धेत जि.प.च्या अध्यक्षा धरती देवरेंसह अधिकारी झाले सहभागी



















धुळे ।जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचार्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आज थाटात उद्धाटन करण्यात आले. क्रीडा ज्योत प्रज्वलन, ध्वजारोहण व पथसंचालनाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. शंभर मिटर धावण्याच्या स्पर्धे त जि.प.च्या अध्यक्षा धरती देवरेंसह अधिकारी व पदाधिकारी देखील सहभागी झाले होते. यावेळी जि.प.च्या अध्यक्षा सौ.धरती देवरे, जि.प.चे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जि.प.च्या महिला बालकल्याण सभापती संजीवनी सिसोदे, शिक्षण व आरोग्य सभापती महावीरसिंग रावल, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, महिला बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी हेमंतराव भदाणे आदी उपस्थित होते. दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजेपासून विविध स्पर्धांना सुरुवात होईल. यामध्ये खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल तसेच जलतरण स्पर्धा पुरुष आणि महिला गटात होतील. दि.१० रोजी कबड्डी, खो-खो, क्रिकेट आणि हॉलीबॉल स्पर्धेचे अंतिम सामने होणार आहेत.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक



शुक्रवार दि. ९ फेब्रुवारी २०२४



# नाशिकमध्ये चौथी बालपरिषद संपन्न

## सलाम मुंबई फाऊंडेशन, एव्हरेस्ट फाऊंडेशनचा उपक्रम












नाशिक । सलाम मुंबई फाऊंडेशन (एसएमएफ) ने एव्हरेस्ट फाऊंडेशनच्या सहयोगाने नाशिकमध्ये नुकतेच चौथ्या बालपरिषदेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनावर आणि समुदायावर परिणाम करणार्या महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी या कार्यक्रमामध्ये सरकारी आणि सरकारी अनुदानित शाळांमधील १७०  हून अधिक विद्यार्थ्यांना एकत्र आणले. कार्यक्रमा दरम्यान प्रतिष्ठित तज्ञांच्या पॅनेलने विद्यार्थ्यांशी तंबाखू संबंधित समस्यांवर संवाद साधला. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना त्यांचे मत मांडण्यासाठी आणि अर्थपूर्ण उपाय शोधून योगदान देण्यासाठी एक अनोखे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. २०१५ पासून नाशिकमध्ये विविध उपक्रमांद्वारे सलाम मुंबई फाऊंडेशनने एव्हरेस्ट फाऊंडेशनच्या साहाय्याने युवा विद्यार्थ्यांसाठी तंबाखूमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या विद्यार्थ्यांना पुढे जाऊन आपले ज्ञान वर्गापलीकडे नेऊन आरोग्यदायी जीवनपध्दतीबाबत जागरूकता निर्माण करत समुदायामध्ये तंबाखू मुक्त जीवनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यातील एक उदाहरण म्हणजे येवला येथील इयत्ता चौथीत शिकणार्या एका विद्यार्थिनीचे तिच्या आईला तंबाखूचे व्यसन होते. एक दिवस ही विद्यार्थिनी सलाम मुंबई फाऊंडेशनच्या जागरूकता कार्यक्रमात सहभागी झाली आणि तिथे तिला तंबाखूच्या गंभीर दुष्परिणामाबाबत माहिती मिळाली. चर्चासत्रामध्ये सहभागी मान्यवरांमध्ये अन्न व औषध प्रशासन नाशिकचे सहआयुक्त उदय लोहकरे, शिक्षण अधिकारी डॉ.नितीन बच्चाव, सिव्हील सर्जन डॉ.चारूदत्त शिंदे, लोकसत्तामधील वरिष्ठ पत्रकार चारूशिला कुलकर्णी, एव्हरेस्ट इंडस्ट्रीज लि.मुंबईच्या कॉर्पोरेट अफेअर्स विभागाच्या प्रमुख स्मिथा पद्मनामभन नायर आणि एव्हरेस्ट इंडस्ट्रीज लखमापूर, नाशिकचे प्रकल्प प्रमुख रमेश कोमाकुलकर यांचा समावेश होता.